# पवित्रशास्त्राचा आरशातून आत्मिक सबळता आणि पवित्रता :- एक परीक्षण

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विध्यार्थी
सामाजिक शास्त्रे प्रशाळा, इतिहास विभाग,
कबचौउमवि, जळगाव,
**(महाराष्ट्र ) भारत**

## प्रस्तावना:-

"पवित्रता ही एक आज्ञा आहे आणि त्या आज्ञेचे पालन करणे हे प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीसाठी क्रमपात्र आहे.कारण आपला देव पवित्र आहे म्हणून त्याची संतान ही पवित्रच पाहीजे.देवाचे राज्य ख्रिस्ती मनुष्याच्या पवित्रतेमुळे वाढते.देवाच्या सानिध्यात जाण्याअगोदर प्रत्येक याजक हा पापाचा कोकरा बळी करून आणि पापांभिकार करूनच परमपवित्रस्थानात प्रवेश करत असे.आपला देव अनाधि-अनंत आणि सार्वकालिक पवित्र असा देव आहे.त्याचे भक्ती करणारे दास हे पवित्र जीवन व्यतीत करून आपल्या प्रभूला प्रदर्शित करीत असतात.म्हणून जॉन मैकआरथर म्हणतात "देव पवित्र आहे आणि त्याची उपासना पवित्र होऊनच केली पाहिजे त्याच्या पवित्रतेची व्याख्या करायची ठरविल्यास असे म्हणता येईल "पवित्रता म्हणजे अद्वितीय अनन्यसाधारण असणे किंवा मनुष्यप्राण्यापासूनचे त्याचे कमालीचे वेगळेपण होय.त्याच्या ठायी कोणतीही उणीव,दोष, पाप,आणि चूक नाही.तसेच तो सर्वस्वी नीतिमान आहे-तो संपूर्ण पवित्र आहे आणि त्याची उपासना करण्यासाठी आपल्याला मूलभूत जाणीव असायला पाहिजे की देव पवित्र आहे" पवित्रता ही एक मूलभूत जाणीव आहे,ही जाणीव प्रत्येक ख्रिस्ती मंडळीला आणि व्यक्तीला पवित्र आत्मा करून देत असतो पण त्याला जो प्रतिसाद देतो त्यालाच पवित जीवन जगण्याची जाणीव रोज होते." कारण जिथे तुझे धन आहे तिथे तुझे मन लागून राहील "

## २) पवित्रता देवाचे दर्शन देते:-

**देवाच्या कृपेने निश्चय करा की,तुम्ही सातत्याने स्वतः चे आत्मपरीक्षण करावे आणि तुमच्या आत्म्याच्या हिशोबाचे निरीक्षण कराव."-जे.सी.रायल-**

देवाचे वचन सांगते _"**सर्व लोकांबरोबर शांतीने राहण्याचा प्रयत्न करा व पवित्र जीवन जगण्याचा प्रयत्न करा. कारण त्याशिवाय (पवित्रते‍िशिवाय) कोणालाही प्रभूला पाहता येणार नाही.**_ (इब्री12:14) आज ख्रिस्ती समाजात वचनापासून काही द्वंद्व निर्माण झालेले आहे.त्याची फोडणी करून अनेक खोट्या उपदेशकांनी आपली असत्याची पोळी तव्यावर शेकून घेतली आहे.अशा लोक देवाच्या सानिध्यात ओळखले जातात कारण त्यांची अशुद्धता पवित्रतेच्या आरशात उघळी पडते. ख्रिस्ती समाजाला जर एकत्र येऊन नांदायचे असेल तर पवित्रता ही पहिली अट आहे.आणि पवित्रतेमुळेच आपण देवाला पाहू शकतो.**"धन्य आहे ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे कारण ते देवाला पाहतील"** ( मत्तय:-५-८ ) अशुद्ध जीवन देवाला अप्रिय आहे,आणि म्हणून जो ख्रिस्तात आहे तो नवीन उत्पत्ती आहे,जुने ते गेले. आता पवित्रता ही नव्या रुपात ख्रिस्ताच्या व्यक्तीची पांघरूण तयार करते आणि त्याचे वस्त्र पवित्रतेत त्याचे शुद्ध चारित्र्य दर्शविते.

## ३) पवित्रता ही देवाची आज्ञा आहे:-

> **देवाचे राज्य बोलण्यात नाही तर सामर्थ्यात आहे.शुद्ध चारित्र देवाचा सामर्थ्याने निर्माण होतं असते,चारित्र्याने सामर्थ्य उत्पन्न होतं नसते.**

संपूर्ण मानवजाती ही पापणे ग्रसीत झालेली होती.पवित्र मनुष्य हाच एक पर्याय होता.मनुष्यबळी पण पापरहित कोकरा कुठे आहे.बाप्तिस्मा करणारा योहान म्हणतो "पहा देवाचा कोकरा जो मनुष्याचे पाप हरून घेऊन जातो ."प्रभू येशू हाच एक मात्र पवित्र मनुष्य होता.मरियमच्या गर्भ हा जगातील पहिला पवित्र गर्भ होता कारण तो पवित्र आत्म्याच्या द्वारे मारियम पोटात गर्भरूप झालेला होता.ख्रिस्त हा जन्मताच पवित्र होता म्हणून तो बलिदानासाठी योग्य होता पापाची शिक्षा भोगून मनुष्यजातील पापाचा बंधनातून सोडवून अनंतजीवनाचा मार्ग प्रशस्थ करणार होता.म्हणून आज प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला देव आज्ञा देत आहे की" **तर ज्याने तुम्हास बोलावले आहे तो जसा पवित्र आहे,तसे तुम्हीही आपल्या सर्व वर्तणुकीत पवित्र व्हा**"( १ पेत्र:-१-१५-१६) पवित्रीकरण ही प्रक्रिया आहे आणि ती प्रीती, विश्वास,आशा आणि दिन-दुबळ्या लोकांची सेवा केल्याने,पवित्रशास्त्रात रममाण झाल्याने त्याची चमक वाढतच जाते. कारण आपला बोलावणारा पवित्र आहे,तर आपणही सर्व कृत्यात आणि कार्यात पवित्र असले पाहिजे.

## ४) पवित्रता ख्रिस्ताला उंच करिते आणि अपवित्रता स्वतःला:-

पवित्रता ही ख्रिस्ताला उंच करते,कारण पवित्र जीवन जगणे हा ख्रिस्ताचा सन्मान असून समाज असे जीवन बघून देवाचे गौरव करते,पण अपवित्र जीवन देवाची योजना एका ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनाला निष्फळ करते.मी आणि माझी पवित्रता ही जगापासून वेगळी आहे,माझी पवित्रताच मला ख्रिस्तात उंच करते आणि मी ख्रिस्ताला;त्यामुळे माझे हे परमकर्तव्य आहे की मी पवित्र जीवन जगावे.**व्हिक्टर जॅक** म्हणतात जेव्हा दाऊद राजाने पाप केले तेव्हा त्याचे चार परिणाम घडून आले.

१) **ते कार्य याहवेच्या दृष्टीने चुकीचे होते :-**जेव्हा एक ख्रिस्ती मनुष्य पाप करतो.आणि अज्ञानात राहून आपले कार्य करीत असतो देव त्याच्या सानिध्यापासून खूपच दूर असतो.

२) **दाऊद चे मन व्याकुळ झाले आणि त्याचे सिहांसनाचे स्थायित्व संपले:-** अपवित्रता एखाद्या मंडळीत प्रवेशित होते.तेव्हा मंडळीचे आत्मिक स्थायित्व घसरते आणि आत्मिक दुबळेपणा त्या मंडळीतील सदस्यांमध्ये निर्माण होतो.

३) **जगिक लोकांसमोर त्याची साक्षी संपूण जाते:-** ख्रिस्ताने महान आदेश दिला आणि त्याचे साक्षी म्हणून त्याच्या शिष्यांना संपूर्ण जगात पाठविले,ख्रिस्ताच्या शिष्य म्हणून पवित्र जीवन जगणे ही माझी सर्वात मोठी जिम्मेवारी आहे.

४) **देवाच्या शत्रूंना निंदा करण्याचे अवसर प्राप्त झाले:-**देवाच्या व्यक्ती जेव्हा चुकतो तेव्हा प्रत्येक मनुष्याचे डोळे त्यावर बिंबलेले असते.जगिक लोकांची आशा ही एका ख्रिस्ती व्यक्तीवर लागलेली असते,त्यामुळे ख्रिस्ती व्यक्तीचे चुकने जा सैतान आणि त्याच्या अनुयायानसाठी मोठी संधी असते देवाची नालस्ती करण्याची.त्यामुळे प्रत्येक ख्रिस्ती मंडळीने आणि व्यक्तीने ही दक्षता घेतली पाहिजे की त्याच्या वाईट कृत्यामुळे फक्त आणि फक्त देवाची महिमा व्हावी नालस्ती नाही.दाऊद राजाने पाप केले आणि अपवित्रताने त्याच्या आयुष्याला गिळंकृत केले पण देवाची कृपा ही असीम आहे.विल्यम मैकडोनाल्ड म्हणतो **"कधीही पाप न करण्यापेक्षा क्षमा पावलेला पापी अधिम श्रीमंत असतो पाप मुबलक आहे (पण) अनुग्रह म्हणजे कृपा ती अत्यंत अदभुत,आश्चर्यकारक, अतर्क्य समृद्ध करणारी आहे"**दाऊद राजाने पश्चाताप केला आणि पवित्रतेत पुन्हा पुनस्थापित होऊन देवाचे कार्य पूर्ण केले. जर मंडळीला आणि ख्रिस्ती व्यक्तीला देवाचे ध्येय पूर्ण करावयाचे आहे तर त्यांनी पवित्रता जपावी.

## ५) देवाचे वचन पवित्र करते:-

***"बायबल जिथं पोहोचत...तिथं सैतान आपलं राज्य सोडून पळतो." (विल्यम कॅरी)***

"**तू त्यांना सत्यात पवित्र कर, कारण तुझा शब्द हेच सत्य आहे**"_ ( योहान 17:17 ) देवाचे वचन सत्य आहे आणि सत्य हीच असत्याची एकमेव तोड आहे.सत्याचे वचन ही देवाची दुधारी तरवार आहे.आणि याच तरवारीने सैतानाची सर्व तीर विझविता येतात.देवाचे वचनचं मला पापापासून दूर ठेवते म्हणून दाऊद लिहितो "मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी तुझे पवित्र वचन हृदयात साठवून ठेवतो" देवाचे वचन मला जीवन जगण्याची कला तर शिकवितेच परंतु त्याबरोबरच पवित्रतेत चालायला मदतही करते.

## ६) जे आळसाने पवित्रताची वाट पाहतात त्यांना पवित्रता प्राप्त होत नाही:-

जो ख्रिस्ती व्यक्ती आपल्या जीवनक्रमात प्रार्थना,उपहास,आणि सुवार्ता देण्यात आले तसेच दिन-दुबळ्या लोकांची सेवा करण्यात गुंतलेला आहे,त्याला पवित्रता आपल्या प्रवाहात वाहून नेते,पण जो

मनुष्य ख्रिस्ताच्या कार्यात आळशी आहे तो अपवित्रतेच्या गर्तेत डूबुन आपले आत्मिक जीवन नाहीसे करण्याच्या प्रयत्नात असतो.

## ७) पवित्रता आणि मी:-

देवाने मला आपल्या स्वरूपात आणि पवित्र असे निर्माण केलेले आहे.आदम आणि हवा यांच्या देवाशी असलेला संबंध अपवित्रतेमुळे नाहीशा झाला.पवित्रता मला एक व्यक्ती म्हणून ख्रिस्तात बांधून ठेवते,देवाच्या सानिध्यात वास्तव्यास नेते,मी मी म्हणून जगत नाही तर ख्रिस्त माझ्याठाई जगत असतो,देवाचे पवित्रीकरण माझ्याजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वाहत असते,ख्रिस्तात मी अंश-अंश बदलतो जातो.कारण देव जसा पवित्र आहे तसा मी पवित्र बनून जीवन यापन करीत असतो.

## ८) देवाची प्रीती आणि पवित्रता देव समान न्याय करितो:-

**जॉन मैकआर्थेर** म्हणतात *"बहुतेक लोक देवाच्या प्रीतीवर इतका प्रमाणाबाहेर भर देतात कि देव पवित्र आहे हे जणू विसरूनच जातात.परन्तु आपण या दोन्ही गोष्टीमध्ये संतुलन राखले पाहिजे.देव फक्त प्रीती आहे आणि तो त्यांच्या पापाला कधीच शिक्षा करणार नाही.असे जे लोक गृहीत धरतात ते हे समजण्यात कमी पडतात कि हाच दयाळू परमेश्वर नीतिमान देखील आहे आणि त्याच्या पवित्रतेविरुद्ध पाप करणाऱ्यांना नक्कीच शिक्षा करतो.दाविदाने केलेल्या दोन भयंकर पातकांचा विचार करा त्याने बेतशेबाशी व्यभिचार केला आणि तिच्या नवऱ्याच्या खून करविला...दाविदाने आपले पाप कबुल केले तरीही त्याला कोणत्या परिणामांचा सामना करावा लागला...तरी देखील देव शिक्षा करतानाही स्मरतो किवा दयेची आठवण करतो"*

**देव प्रीती आहे पण देव न्यायी देखील आहे.देवाच्या प्रीतीच्या अतिरेक करणाऱ्यांना देव दंडित करीत असतो.कृपेच्या नावाखाली पाप धकून चालत नाही,निष्फळता चालत नाही,अवज्ञेची आज्ञा चालत नाही,पाप हे कोणत्याच परिस्थितीत चालत नाही कारण यहुदा देखील प्रीतीचे चुंबन घेऊन ख्रिस्ताशी विश्वासघात करतांना दिसतो,सौल देखील याजकपनाचे अधिकार वापरून आज्ञा तोडतांना दिसतो,पेत्र देखील ख्रिस्ताशी एकनिष्ठ राहण्याच्या संकल्प दाखवून तीन दा नकार करतांना दिसतो,त्यामुळे देवाची प्रीती हि तुमच्या पापांना पांघरून घालू शकते पण परिणामांना नाही.म्हणून पवित्रता हि प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला जपावीच लागणारा प्रीतीच्या नावाखाली ती धकवून घेतली जाणार नाही.**

*एकंदरीत पवित्रता हि देवाची आज्ञा असून पवित्र जीवन जगणे,पवित्र आत्म्याच्या आणि पवित्रशास्त्राच्या माध्यमातून होत असते.आणि मी रोज आणि रोज नवीनतेत बदलत जात असतो.पवित्रता हि माझ्या जीवनाची प्रमुख अंग बनते.आणि देवाचे राज्य हे माझ्यात वाढत जाते.पवित्रता हि एका ख्रिस्ती व्यक्तीच्या केंद्रस्थानी असते आणि जग त्याच्या चार दिशांमध्ये; ख्रिस्ती व्यक्ती या जगात आहे.पण तो या जगताचा नाही कारण तो पवित्र केला गेलेला ख्रिस्ताचा अनुयायी आहे.ख्रिस्ताचा अनुयायी आहे म्हणून पवित्र जीवनाची अपेक्षा फक्त देवच करत नाही तर हे जग देखील करते.कारण*

*या जगतातील प्रत्येक मनुष्याचे उद्धार व्हावे हि देवाची इच्छा आहे आणि त्यासाठी मी एक पवित्रजीवन जगून पवित्रता जपावी.*

### *9) प्रभूमध्ये आणि त्याच्या शक्तीच्या बळामध्ये सबळ व्हा" (इफिस:-५:-१०)*

"प्रभू आणि त्याच्या शक्तीचे बळ कोणते?आम्हाला कशात सबळ व्हायचे आहे? संत पॉल इफिस येथील मंडळीला आत्मिकशस्त्रे परिधान करण्या अगोदर हे वचन सांगतो आणि मग आत्मिक शस्त्रांची चर्चा करतो.प्रभूने त्याची शक्ती आणि त्याचे बळ त्याने पवित्रशास्त्रात श्वासाद्वारे संचारीत करून ठेवलेली आहे.आणि त्या शक्तीला पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखालीच उजागर करता येते.जेव्हा ही शक्ती उजागर होते तेव्हा एक ख्रिस्ती मनुष्य आत्मिकतेत प्रबळ होतो,पवित्रशास्त्राच्या शब्दावरील विश्वासाने आणि आधाराने तो स्थिर उभा राहतो.ही आत्मिक प्रबळता आणि सबळता त्याला आत्मिकतेच्या युद्धात एक विजयी योद्धा म्हणून विश्वासाने उभी करते.आणि ते युद्ध देखील देवच लढत असतो हा फक्त उभा असतो.देव त्याच्या आत्मिक लेकरांना फक्त प्रबळतेने उभा राहण्यास सांगतो संपूर्ण युद्ध तोच संचालित करतो,कारण आपला जन्म विजय मिळविण्यासाठीच झालेला आहे."

### १०)**पवित्रशास्त्राची व्याख्या काय आहे?**

पवित्रशास्त्र का दिला गेला? पवित्रशास्त्र मला कोणते प्रकटीकरण पुरविते?.अशी अनेक प्रश्न आज कोणाला पडत नाही,कारण ख्रिस्ती वर्ग स्वतःला पवित्रशास्त्र आणि त्याच्या प्रकटिकरणात परिपूर्ण समजतो आणि त्यामुळे आत्मिक जीवन व्यतीत करून सुद्धा ते आत्मिकतेत प्रबळ होत नाही.सर्व्यांना माहीत आहे पवित्रशास्त्र हा शब्द बिल्लोस या शब्दापासून तयार झालेला असून त्याच्या अर्थ पुस्तकांचा संग्रह असा होतो. आणि शास्त्रात ६६ पुस्तके आहेत.पण या पुस्तकांचा संख्येला जर-६५ केले तर काही ख्रिस्ती लोकांनी एकदाही पवित्रशास्त्र वाचलेले नसणार,बायबलच्या अर्थ पुस्तकांचा संग्रह असा होतो,पण काही ख्रिस्ती मंडळीत आणि ख्रिस्ती लोकांच्या घरी पवित्रशास्त्रावर आधारित पुस्तके क्वचित सापडतील. बायबलच्या प्रत्येक शब्दात देवाच्या श्वास फुंकलेला आहे,पण तो श्वास ग्रहण करायला ख्रिस्ती लोकांना वेळ नाही,पवित्रशास्त्र वाचल्याशिवाय आणि पाळल्याशिवाय कोणीही आत्मिकतेत पूर्ण वाढ करू शकत नाही.

### ११) पवित्रशास्त्र देवाच्या प्रेरणेने त्यांच्या लोकांनी शब्दबद्ध केलेला आहे:-

पण जेव्हा काही ख्रिस्ती लोक देवाच्या या पवित्र शब्दाला वाचतात तेव्हा असे वाटते वाचणारा जे शब्द उच्चारत आहे ते जीवंत शब्द आहे,पण वाचणारा मात्र मरलेला दिसतो. _मी स्पष्ट सांगतो देवाचे वचन अथवा शब्द कधीही निष्फळ होत नाही,पण ते शब्द उंच्चारणारा ते पवित्र शब्द प्रचारीत करण्याच्या लायकीचा नाही म्हणून ते शब्द निष्फळ होतात.***आपण कधी पर्यंत आपली प्रतिमा मीच खरा ख्रिस्ती आहे*** असे ठेवणार.देवाने त्याची प्रेरणा देऊन पवित्रशास्त्राची निर्मिती केलीच आहे.पण

वाचणाऱ्यांनी हे लक्षात ठेवायला हवे की आपणही पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने पवित्रशास्त्र वाचावे,तेव्हाच आपली उन्नती होईल आणि आपण आत्मिक प्रबळतेत वाढत जाऊ.

वाचणाऱ्याला पवित्र आत्मा रोज ओरडून सांगतो '***देवाचा शब्द ऐक***' पण काही शास्त्र वाचणाऱ्या ख्रिस्ती लोकांना सैतान त्याची प्रार्थना शिकवितो ती अशी ***"देव तुझे नाव पवित्र मानले जावो,कारण मी आज देखील अपवित्रच आहे,तुझे राज्य येवो कारण मला ख्रिस्ती जीवनात तीस वर्षे झाली पण माझ्यात तुझे राज्य अजून आले नाही.कारण माझी दुसऱ्या राज्याशी संधी आहे,जशी स्वर्गात तुझी इच्छा पुरी होते तशीच पृथ्वीवरही होऊ दे,कारण मी तुझ्या इच्छाप्रमाणे चालतच नाही,काल मीने चिकन खाल्ले आणि आज तू मटण दिलेस म्हणून तुझे आभार,काल झालेली चूक आणि भूल मी आज पुन्हा केलेली आहे मला क्षमा कर.आणि जसे मीने आपल्या वाईट करणाऱ्यांना क्षमा केली नाही,तू मला क्षमा कर.कारण माझ्या जीवनक्रमात प्रामुख्याने, भौतिकतेचे वलय,मूर्खपनाचे कटोरे आणि अनंतमृत्यूचे दूत नेहेमी मला मार्गदर्शन करीत असतात.धन्यवाद.''***

*अहो ख्रिस्ती लोकांनो देवाच्या शब्द ऐका,अहो स्वतःला देवाच्या दास म्हणवून घेणाऱ्यांनो देवाचा शब्द ऐका,अहो चर्चच्या बागव्यांवर बसणाऱ्यांनो देवाचा शब्द ऐका,शमूएलने देवाच्या शब्द ऐकला,एलियाने देवाचा शब्द ऐकला,एज्रा आणि नेहेम्याने देवाचा पवित्रशब्द वाचून दाखविला,योहान पवित्रआत्मेत वर उचलला गेला आणि त्याने देवाचे दर्शन घेत,शब्द ऐकून,प्रकटीकरण शब्दबद्ध केले.आज का मी आत्मिक प्रबळतेत कमजोर आणि क्षीण आहे.कारण मी पवितशास्त्राला वाचतो पण विसरून जातो,प्रकटीकरण प्राप्त करतो पण सोडून देतो, अविश्वासाने वाचतो,विश्वासाने वचन ग्रहण करीत नाही,पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने शास्त्र समजत नाही,अशी अनेक कारणे आहेत म्हणून त्याने* काय करावे तर "यहोवाच्या नियमशास्त्रात त्याने संतोष मानायला हवा,दिवस व रात्र त्याने नियमशास्त्रावर ध्यान केंद्रित करावे"(**स्रोतसंहिता:-१-२)** हे केल्यावरच तो एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून देवाच्या शक्तीत आत्मिक प्रबळता प्राप्त करू शकेल.

***सर्व शास्त्रलेख ईश्वरप्रेरित आहे*** मग आज का काही ख्रिस्ती लोक आपल्या स्वातंत्र्याच्या गर्तेत राहून शास्त्राला दूर सारतात,वडीलांनी मुलाला सांगितले ज्या शास्त्र वाच.मुलगा सांगतो मला अभ्यास करायचा आहे,मुलाला सांगितले प्रार्थना कर.मुलगा ओरळतो माझी वेळ झाली की मी करेन,मुलाला सांगितले चर्चला जायचे आहे लवकर तयारी कर मुलगा सांगतो तुम्ही पुढे जा मी येतो.हे चित्र ईश्वरप्रेरीत ख्रिस्ती कुटुंबाचे असु शकते का? ***देवाने आपल्यांना त्याच्या शास्त्रात पारंगत होण्यासाठी सांगितलेले नाही तर पवित्रशास्त्राच्या प्रकटिकरणात चालण्यास सांगितलेले आहे.***समग्र प्रेरणेवर म्हणजे संपूर्ण ११८९ अध्यायावर मला प्रेरित होऊन चालणे आहे,म्हणजे संपूर्ण पवित्रशास्त्र मला देवाच्या सत्यात आणि प्रकटिकरणात चालण्यास उपयुक्त आहे.असा त्याच्या अर्थ होतो,म्हणजे पवित्रशास्त्राच्या कोणत्याही वचनाद्वारे तुम्ही आशीर्वादित होऊ शकता.

**जेम्स नायस्मिथ_** म्हणतात "**एखादया व्यक्तीच्या शब्दावर आपण विश्वास ठेवू शकत नाही तर त्या व्यक्तीवरही आपण विश्वास ठेवू शकत नाही**.'' ख्रिस्ती लोकांपुढे हे मोठे आव्हान आहे,जेव्हा माझ्या जीवनात पवित्रशास्त्राचे एखादे वचन निष्फळ होते तेव्हा माझ्या अविश्वास प्रदर्शित होतो आणि जेव्हा वचनावरील प्रेरणा माझी चुकीची असते तेव्हा देवावरील माझा विश्वास खोटा ठरतो.कारण पवित्रशास्त्र वाचतांना प्रथम शब्द येतात आणि मग वचन आणि अध्याय,मी कशावर उभा आहे वाळू की खडकांवर अविश्वास वाळूप्रमाणे आहे आणि विश्वास खडकाप्रमाणे.

**विल्यम कैरी** म्हणतात ***"प्रभूने प्रकाश दोन प्रकारे दिलाय.एक म्हणजे सद्सद्विवेकाद्वारे दुसरा बायबलमधून"*** पण सद्सद्विवेक तेव्हाच जागृत होतो जेव्हा पवित्र आत्मा त्याला साहाय्य करतो.पवित्रशास्त्र वाचल्याने देवाचा प्रकाश मिळतो म्हणजे मार्गदर्शन आणि सामर्थ्य प्राप्त होते,कोणत्याही ख्रिस्ती व्यक्तीसाठी या गोष्टी अगत्याची असून आत्मिक प्रबळतेत जर वाढ करायची असेल तर. "*नियमशास्त्राचे पुस्तक तुझ्या तोंडातून निघून जाऊ नये,तर दिवसा आणि रात्री तू त्यावर ध्यान लाव,अशासाठी की जे सर्व त्यात लिहिले आहे त्याप्रमाणे करण्यास तू जपावे,कारण तेव्हा तू आपला मार्ग सफल करशील,आणि तेव्हा तू सुज्ञतेने वागशील" (**यहोशवा:-१-८-पं. रमाबाई-बायबल**)*

***विल्यम मैक्डोनाल्ड*** लिहितो ''**आमची सर्व धर्मकृत्ये घाणेरड्या वस्त्रासारखी होतात.पण मनुष्याच्या नवीन जन्मासह सर्व परीस्थित पालटते.अशावेळी देववचनांचे आज्ञापालन करून केलेले कोणतेही कार्य चांगलेच ठरते.**'' देववचनाचे पालन हे एका ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनाचे खरे चित्र दाखविते,नवीन जीवन काय असते हे त्याच्या आज्ञापालन आणि समर्पण कार्याने सिद्ध होते त्याला त्यासाठी चारित्र्याचे गुणपत्रक दाखविण्याची गरज नाही.कारण तो स्वतः आत्मिकेत एक नवी उंची प्राप्त करतो आणि आणि आपल्या आत्मिक फळांच्या कार्याने तो हे दाखवून देतो कि त्याने आत्मिक प्रबळतेत प्राविण्य मिळविलेले आहे.

देव सत्य आहे आणि देव खरा हि आहे म्हणून देवाचे वचन सांगते **''देव खरा आहे आणि प्रत्येक माणूस लबाड दिसून येवो''(२ करंथी-१-१८)** पवित्रशास्त्र हे कोणाला खोटे म्हणून दाखविण्यासाठी लिहिले गेले नाही.पण काही लोकांसाठी हे वचन खरे आहे.जे स्वत:ला ख्रिस्ताच्या स्थानावर ठेवून पवित्रशास्त्राचे पठन करितात,पण खरा ख्रिस्ती व्यक्ती हे पाहत असतो कि पवित्रशास्त्र वाचून मला काय प्राप्त झाले.माझ्यात कोणते परिवर्तन आले,माझे अज्ञान दूर झाले कि नाही,मी देवाच्या वचनाप्रमाणे वागत आणि बोलत कि नाही,देव खरा आहे पवित्रशास्त्राच्या माध्यमातून माझ्या उणीवा दूर झाल्या आहे.मी आत्मिकेतेच्या मार्गावर सुधारणा करीत पुढे जात आहे.खरोखर देव तू खरा आहे आणि मी खोटा.असा म्हणणारा मनुष्य प्रामाणिक असतो.*''देवा मी प्रार्थना करतो ''माझ्या आत्मिक जीवनात तुझ्या सामर्थ्याची प्रबळता येऊ दे''..आमेन''*

## संदर्भग्रंथसूची:-

१) ख्रिस्ती शिष्यत्व,विल्यम मैक्डोनाल्ड,महान प्रीती प्रकाशन,१९८०,पुणे.
२) या विषयावर लक्ष द्या,जी एस प्रकाशन,२००७,मुंबई.
३) बायबल देवाचे अचूक वचन,लव्ह महाराष्ट्र,२०१६,पुणे.
४) पवित्रशास्त्र,नवा करार,२ करंथीकरास पत्र-१-१८.
५) पवित्रशास्त्र,जुना करार -यहोशवा-१-१८.
६) पवित्रशास्त्र,जुना करार,स्तोतसंहिता-१-२.
७) पवित्रशास्त्र,नवा करार-मत्तय -१-८.